महाराष्ट्र शासन वीण समृद्धीची

Azadi Ka Amrit Mahotsav

# Tex-Connect

महाराष्ट्र शासनाच्या वस्त्रोद्योग विभागाचा एक पुढाकार



## आतील मुद्दे


| | |
|---|---|
| मुख्य क्षेत्र | Pg. 2 |
| धोरणातून | Pg. 3 |
| कार्यक्रम आणि घोषणा | Pg. 4-8 |




“ महाराष्ट्रातील जनतेसोबत राष्ट्रीय हातमाग दिनाचा दशकपूर्ती सोहळा साजरा करताना मला अत्यंत अभिमान वाटतो. हा प्रसंग केवळ आपल्या वैभवशाली वस्त्रपरंपरेला दिलेली मानवंदना नसून, ती जपण्याची, वाढवण्याची आणि पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचवण्याची आपली जबाबदारी पुन्हा एकदा अधोरेखित करणारा आहे

महाराष्ट्र हे अनेक शाश्वत विणकाम परंपरांचे माहेरघर आहे. राजस पैठणी, नाजूक हिमरू, रेखीव कर्वत काठी साडी, झगमगीत खाना आणि टिकाऊ घोंगडी. ही केवळ कापडं नाहीत, तर आपल्या संस्कृतीचा आणि कारागिरीचा जिवंत अविष्कार आहेत.

महाराष्ट्र शासन विणकर बांधवांना कौशल्यविकास, नवप्रवर्तन आणि बाजारपेठेची संधी यांद्वारे सक्षम बनवण्यासाठी कटिबद्ध आहे. त्यांच्या कलाकुसरीला जागतिक व्यासपीठावर नेण्याचा आमचा संकल्प आहे. हातमाग हा शाश्वत फॅशनचा आत्मा आहे आणि त्यांना पाठिंबा देणे म्हणजे पिढ्यान्पिढ्यांचे उपजिविकेचे साधन, प्रतिष्ठा आणि अभिमान जपणे होय.

**श्री.संजय सुशिला वामन सावकारे**
**मा. मंत्री (वस्त्रोद्योग)**
**महाराष्ट्र शासन**

# क्षेत्रात विशेष लक्ष: राष्ट्रीय हातमाग दिनाचे एक दशक

## परिचय भाग

राष्ट्रीय हातमाग दिन दरवर्षी ७ ऑगस्ट रोजी साजरा केला जातो. हा दिवस १९०५ मधील स्वदेशी चळवळीच्या प्रारंभाचा स्मरणदिन असून, भारताच्या समृद्ध हातमाग परंपरेला दिलेली आदरांजली आहे. गेल्या दशकात या दिनाने परंपरा, लवचिकता आणि नवप्रवर्तनाचा राष्ट्रव्यापी उत्सव म्हणून स्वतःची ओळख निर्माण केली आहे. २०१५ पासून सुरू झालेल्या या उपक्रमामुळे, हा दिवस फक्त स्मरणरूप कार्यक्रमापुरता मर्यादित न राहता, धोरणात्मक हस्तक्षेप, बाजारपेठेची दारे आणि भारतीय हातमागाचे जागतिक स्तरावर प्रतिनिधित्व करण्याचे मंच बनला आहे.

या दशकात अनेक महत्त्वपूर्ण टप्पे गाठले गेले आहेत – "हँडमेड इन इंडिया" या ओळखीची वाढती जाणीव, भौगोलिक निर्देशांक (GI) मानांकन, प्रादेशिक विणकाम व त्याची प्रतिमा ओळख व विस्तार, कारागिरांचे डिजिटल बाजारपेठेत सामाविष्ट होणे, आणि हातमाग समूहांना संस्थात्मक पाठबळ मिळणे. यामुळे तरुण पिढीत हातमागाविषयी नव्याने रस निर्माण झाला असून, तो शाश्वतता आणि सांस्कृतिक अभिमानाचे प्रतीक ठरत आहे.

या दहा वर्षांच्या प्रवासानंतर, राष्ट्रीय हातमाग दिन हा रोजगार निर्मिती, महिला सशक्तीकरण आणि स्थानिक ज्ञानाचे जतन यामध्ये हातमाग क्षेत्राची भूमिका अधोरेखित करतो. हा एक असा धागा आहे जो भारताच्या सामाजिक व आर्थिक रचनेला बळकट करत राहतो.



भारत सरकार हातमाग समूहांना कौशल्य विकास, पायाभूत सुविधा, डिझाईन आणि आर्थिक सहाय्य यांद्वारे सर्वांगीण पाठबळ प्रदान करते

## महाराष्ट्राची हातमाग परंपरा

भारताच्या वस्त्र नकाशावर हातमाग परंपरेत महाराष्ट्राचे एक आगळं-वेगळं स्थान आहे, जिथे प्रत्येक प्रदेश आपली ओळख शाश्वत आणि वैशिष्ट्यपूर्ण कापडाच्या विणकामाव्दारे दाखवतो. औरंगाबादची राजेशाही पैठणी साडी ज्यात अत्यंत बारीक जरीकाम आणि रंगीबेरंगी नक्षीकाम आहे, तसेच हिमरू वस्त्रे जी कधीकाळी राजघराण्यांची पसंती होती. महाराष्ट्राची हातमाग परंपरा ही कलेचा आणि सांस्कृतिक प्रतीकांचा संगम आहे.

राज्याची ही विविधता सोलापूरची इकाल साडी व पुणे-सोलपुरची नारायण पेठ साडी आणि धारवाड—बेळगावच्या झगमगत्या खण साडीतही प्रतिबिंबित होते आणि या विणकाम परंपरेत स्थानिक इतिहास आणि समाजाच्या उपजिविकेचे घट्ट वीण आहे. यापैकी अनेक वस्त्रप्रकारांना भौगोलिक निर्देशांक (GI) मानांकन मिळाले आहे, जे त्यांचं सांस्कृतिक आणि आर्थिक महत्त्व अधोरेखित करतं.

सौंदर्याच्या पलिकडे, महाराष्ट्रातील हातमाग क्षेत्र ग्रामीण कारागिर, महिला आणि पारंपरिक विणकर समुदायांसाठी महत्त्वाचा रोजगाराचा स्त्रोत आहे. तसेच, ही कला केवळ रोजगाराचा स्त्रोत नसून, ती पिढ्यान् पिढ्याचे कौशल्य व वारसा जपण्याचे आणि जिवंत ठेवण्याचे काम करत आहे.

आज ज्या काळात हातमाग पुन्हा एकदा शाश्वत, पर्यावरणपूरक उत्पादन प्रक्रियेसाठी चर्चेत आहे, त्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्राची ही समृद्ध विणकाम परंपरा डिझायनर्स, धोरणकर्ते आणि ग्राहक यांना नवे विचार देत आहे आणि परंपरेला नव्या गरजांशी जोडत आहे.

# राज्याची हातमाग वारसा जपण्यातील प्रयत्न

## धोरणातून: महाराष्ट्राचा हातमाग क्षेत्रावर लक्ष केंद्रीत करणे

हातमाग क्षेत्र, भारतातील सर्वात मोठ्या असंगठित उद्योगांपैकी एक, ग्रामीण आणि अर्ध-ग्रामीण उपजिविकेसाठी अत्यंत महाराष्ट्राचे आहे. चौथ्या हातमाग जनगणनेनुसार (२०१८), महाराष्ट्रात ३,३५४ हातमाग चालवणारे ३,५०९ कारागीर आहेत, जे या क्षेत्राच्या वारसा आणि उपजिविकेचे महत्त्व अधोरेखित करतात.

एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरणानुसार महाराष्ट्र सरकार या क्षेत्राला सर्वांगीण पाठबळ पुरवते. भारत सरकारच्या राष्ट्रीय हातमाग विकास कार्यक्रमाचा (NHDP) लाभ घेऊन क्लस्टर विकास, विपणन मदत, सवलतीचे कर्ज, कल्याणकारी उपाय आणि मोठ्या हातमाग प्रकल्पांवर भर दिला जातो. शहरांमध्ये “अर्बन हाट” स्थापन करून पारंपारीक विणकरांना आकर्षक आणि सहज पोहोचण्यासारखे बाजारपेठा उपलब्ध करून दिल्या जातात.


पायाभूत सुविधा आणि उत्पादनांमध्ये वैविध्य आणण्यासाठी महाराष्ट्र सरकार भारतीय हातमाग तंत्रज्ञान संस्था (IIHT) सोबत भागीदारी करत आहे, जिथे केंद्र आणि राज्य सरकार ८०:२० प्रमाणात निधी पुरवठा करतात. कच्चा माल पुरवठ्यामध्ये कारागिरांना ३०% सवलत दिली जाते (१५% केंद्र + १५% राज्य). प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजनेअंतर्गत जीवन विमा देऊन विणकरांच्या कल्याणाला प्रोत्साहन दिले जाते, ज्याचा विमा हप्ता राज्य सरकारने उचललेला आहे. विणकरांच्या कुटुंबांसाठी दरमहा २०० युनिट मोफत वीज पुरवली जाते. तसेच महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळाच्या (www.mahahandloom.com) ऑनलाईन पोर्टलमार्फत विक्रीला प्रोत्साहन दिले जाते.

या सर्व उपाययोजनांमुळे क्लस्टर मजबूत होतात, बाजारपेठ वाढते आणि विणकरांच्या कल्याणाची हमी होते, ज्यामुळे महाराष्ट्राचा हातमाग क्षेत्र सांस्कृतिकदृष्ट्या समृद्ध आणि आर्थिकदृष्ट्या शाश्वत राहते.




*महाराष्ट्रातील पारंपरिक वस्त्रकला ही समृद्ध परंपरा, कौशल्य आणि कलात्मकतेचे प्रतीक आहे. प्रत्येक विण ही संस्कृती, कारागिरी आणि शाश्वत सौंदर्याची कहाणी सांगते.*

## सवलतींना सुलभ प्रवेशासाठी हातमाग पोर्टल




विणकरांसाठी हातमाग पोर्टल — नोंदणी आणि सवलतींसाठी अर्ज करण्यासाठी

वस्त्रोद्योग विभागाने विणकरांसाठी एक साधे आणि वापरायला सोपे ऑनलाइन पोर्टल सुरु केले आहे, ज्याद्वारे ते सहजपणे नोंदणी करून विविध हातमाग संबंधित योजना आणि सवलतींचा लाभ घेऊ शकतात. नोंदणी केल्यानंतर विणकरांना एक विशेष ओळख क्रमांक दिला जातो, ज्यामुळे ते आपल्या अर्जांची स्थिती तपासू शकतात आणि एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण २०२३—२८ अंतर्गत लाभ मिळवू शकतात.

# घोषणा


## ११ वा राष्ट्रीय हातमाग दिन उत्सव




महाराष्ट्र शासनाच्या वस्त्रोद्योग विभागाने ११ वा राष्ट्रीय हातमाग दिन मुंबईतील मंत्रालयात एक आठवडाभर चाललेल्या रंगतदार प्रदर्शनासह, मोठ्या अभिमानाने व उत्साहाने साजरा केला. या विशेष कार्यक्रमाला मा. श्री. संजय सावकारे (मंत्री, वस्त्रोद्योग), श्रीमती.अंशू सिन्हा, भा.प्र.से. (प्रधान सचिव, वस्त्रोद्योग) आणि श्री. संजय दैने, भा.प्र.से. (आयुक्त, वस्त्रोद्योग) या मान्यवरांची उपस्थिती लाभली. महाराष्ट्रभरातून आलेल्या अनेक प्रदर्शकांनी सहभाग घेतला, तसेच या प्रदर्शनात राज्याच्या समृद्ध हातमाग परंपरा आणि वैविध्यपूर्ण विणकामाची झलक पाहायला मिळाली. कारागीर, हितधारक आणि नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभलेल्या या कार्यक्रमामुळे, वारसा जपण्याबरोबरच हातमाग समुदायांसाठी संधी निर्माण करण्याच्या सरकारच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांना अधोरेखित करणारा एक यशस्वी उपक्रम ठरला.

# घोषणा

## करघा मालिका: हिमरूच्या शाश्वत वारशाचे सादरीकरण







पाहा येथे क्लिक करा
EPISODES

वस्त्रोद्योग विभागाने प्रसार भारतीच्या सहयोगाने 'करघा' मालिकेची सुरुवात केली आहे, ज्यामध्ये छत्रपती संभाजीनगरच्या प्रसिद्ध हिमरू कापडाचा प्रवास उलगडला जातो. १४व्या शतकात पारशी ब्रोकेड्सला स्थानिक पर्याय म्हणून उदयास आलेले हिमरू आजही रेशीम, सुती व प्रसंगी चांदीच्या धाग्यांनी विणले जाते, आणि त्याच्या नाजूक डिझाईन्ससाठी जागतिक स्तरावर प्रसिद्ध आहे. 'करघा' मालिका हिमरू विणकरांची कारागिरी, त्यांची यशोगाथा आणि महाराष्ट्र शासनाच्या योजनांमुळे त्यांच्या जीवनात झालेला सकारात्मक बदल अधोरेखित करते.
या उपक्रमाच्या माध्यमातून, विभागाचा उद्देश राज्याच्या समृद्ध वस्त्रवारशाची जनजागृती करणे आणि हिमरूसारख्या परंपरागत कलांना आधुनिक काळातही ओळख आणि बाजारपेठ मिळवून देणे आहे. ही मालिका स्थानिक कारागिरांच्या कौशल्याबद्दल कृतज्ञता निर्माण करून या शाश्वत परंपरांचा सांस्कृतिक अभिमान अधिक बळकट करेल.

## चला, अनुभवूया हिमरू कापडाची जादू!

**प्रकरण १** — या भागात हिमरू कापडाचा प्रवास उलगडला जातो. हिमरूचा उगम १४व्या शतकात महाराष्ट्रातील छत्रपती संभाजीनगरच्या भूमीवर झाला. पारशी ब्रोकेड्सला स्थानिक आणि परवडणारा पर्याय म्हणून त्याची निर्मिती झाली. हिमरू ही पारशी कारागिरी आणि भारतीय कलाकौशल्याचा अनोखा संगम आहे. प्रसिद्ध प्रवासी मार्को पोलो यांनी देखील हिमरूचे प्रशंसा केलेली आहे.
या भागात हिमरूच्या रचना, डिझाईन आणि उत्पादन प्रक्रियेविषयी सविस्तर माहिती दिली आहे. यासोबतच नवाबपुरा येथील इम्रान कुरेशी यांची यशोगाथा देखील प्रदर्शित केली आहे. त्यांच्या कुटुंबाचा सहा पिढ्यांपासून हिमरू व्यवसायाशी संबंध असून, आजही ते या पारंपरिक कलेचे जतन करण्यासाठी कटिबद्ध आहेत.






# कार्यक्रम / घोषणा

## करघा मालिका: हिमरूच्या अमर वारशाची झलक





**प्रकरण २** — या भागात हिमरूच्या डिझाईनची खासियत आणि त्याचा छत्रपती संभाजीनगरहून जागतिक पातळीवर होणारा प्रसार मांडण्यात आला आहे. इंजिनियरिंग पदवीधर फैयसाल कुरेशी यांनी या पारंपरिक कलेला वाचवण्याचा निर्धार केला आणि कुटुंबाचा वारसा पुढे नेण्याचे काम सुरू केले. १८९१ साली त्यांचे आजोबा झफर गेट येथे हिमरू कारखाना सुरू करून या कलेला नवे आयाम दिले, तर फैयसाल यांनी आज त्याच्या डिझाईन, तंत्रज्ञान आणि विपणनाला नवीन उंचीवर नेले आहे. या भागात महाराष्ट्र शासनाच्या हिमरू जतन करण्याच्या योजनाही समाविष्ट आहेत, ज्यामुळे ही शाश्वत कला उज्वल भविष्यासाठी सज्ज आहे.





**प्रकरण ३** — हिमरू जतन करण्यासाठी सुरू असलेले प्रयत्न एका तरुण कारागिराच्या कहाणीमार्फत सादर करण्यात आले आहेत, जिने बिडकीन गावापासून ३० किमी दूर झफर गेटवर आपल्या शिक्षक विजय शंकर राव खोजे यांच्यासह हिमरू शिकायला आलेली आहे. या प्रयत्नात महाराष्ट्र शासनाच्या योजनाही महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. अनेक अडचणी असूनही दीपालीची हिमरू शिकण्याची उत्कटता आणि विजय खोजे यांचा ४० वर्षांपासून या कलेसाठी केलेला समर्पित प्रयत्न, या कलेच्या जतनासाठी सकारात्मक उदाहरण ठरतो. हिमरू शॉल, स्टोल आणि साड्यांसाठी ग्राहकांचा उत्साह तरुण आणि वयोवृद्ध दोन्ही कारागिरांमध्ये सामायिक होतो, ज्यामुळे हिमरू आपले पूर्वचे ओळख पुन्हा मिळवेल, अशी आशा निर्माण होते.

# कार्यक्रम / घोषणा

## करघा मालिका : हिमरूच्या चिरंतन परंपरेचा गौरव






**प्रकरण ४** — या भागात छत्रपती संभाजीनगरमधील हिमरू कारागीर—मुहम्मद यासिन, सिराजुन्निसा बेगम आणि समीना हिंगोरा—यांचा परिचय करून देण्यात आला आहे, जे नाश होत्या असलेल्या या कलेचे जतन करत आपल्या कुटुंबाचा जीविका चालवत आहेत. हिमरूच्या समृद्ध वारसा, अनोख्या डिझाईन्स आणि महाराष्ट्र शासनाच्या योजनांनी या कारागिरांना कसे सक्षम बनवले आहे, हे या प्रकरणात उलगडले आहे, ज्यामुळे त्यांनी आपले जीवन पुनरुज्जीवित केले आहे.






**प्रकरण ५** — या भागात छत्रपती संभाजीनगरच्या प्रत्येक भागातील हिमरू विणकरांच्या जीवनावर एक नजर टाकण्याचा प्रयत्न केला आहे. या सूतांच्या सुंदर जगात फेरफटका मारताना, त्या कलेच्या इतिहासाला सुद्धा सूताच्या टोकाला धरून उलगडण्याचा मनसूबा आहे. सूतांनी जादू विणणाऱ्या विणकरांनी त्यांच्या कलेने नेहमीच मंत्रमुग्ध केले असले तरी, त्यांची आर्थिक परिस्थिती चिंतेची बाब आहे. तरीही आनंदाची गोष्ट म्हणजे हिमरूला जपणारे आणि पुढे नेणारे लोक आजही या कलेचे रक्षण करत आहेत.

हे लोक हिमरूच्या रंगांनी त्यांच्या जीवनात नवे रंग भरत आहेत. ही कथा तीन महिला कारागिरांची आहे—फरझाना शेख, नबीला शेख, आणि अकीरा हज्रा—ज्यांनी हिमरूच्या कामामुळे त्यांच्या जीवनात घडवलेले बदल आणि हिमरू जपण्यासाठी केलेले प्रयत्न दाखवले आहेत. या हिमरू कारागिरांच्या आर्थिक आणि सामाजिक परिस्थितीचेही वर्णन आहे—जरी ते अत्यंत कठीण काळात जगत असले तरी, या महिलांनी हिमरू जपण्यासाठी केलेल्या मेहनतीतून आशा जागते. नक्कीच, महाराष्ट्र शासनाच्या योजना त्यांना पाठिंबा देत आहेत.

# कार्यक्रम / घोषणा







आदरनीय वस्त्रोद्योग मंत्री आणि प्रधान सचिव (वस्त्रोद्योग) यांनी FICCI TAG २०२५ च्या वार्षिक परिषदेला मुख्य अतिथी म्हणून मान दिला. या परिषदेत भारतीय वस्त्रोद्योगातील वाढ आणि जागतिक स्पर्धात्मकतेसाठी गुंतवणूक संधी, मुक्त व्यापार करार (FTAs), आणि टिकाऊपणा यावर भर देण्यात आला.






हातमाग उत्पादन विक्री केंद्राचे उद्घाटन समारंभ, हातमाग सप्ताहाच्या उत्सवांच्या भाग म्हणून आयोजित

## आमच्याशी संपर्क साधा

श्री श्रीकृष्ण बाबूराव पवार
उपसचिव (वस्त्रोद्योग), सहकार, पणन आणि वस्त्रोद्योग विभाग (CMTD), महाराष्ट्र शासन

फोन (कार्यालय): ०२२- २२०२५१५९
ई-मेल: shrikrishna.pawar@nic.in

**अस्वीकरण:** या वृत्तपत्रात दिलेली माहिती अचूकता आणि विश्वासार्हता सुनिश्चित करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले गेले आहेत, तरीही त्याची पूर्णता किंवा वेळेवर उपलब्धता हमी दिली जात नाही. दिलेली माहिती केवळ सामान्य उद्देशासाठी आहे आणि ती कायदेशीर, आर्थिक किंवा व्यावसायिक सल्ला म्हणून घेतली जाऊ नये. प्रस्तुत सामग्री केवळ माहिती देण्यासाठी आहे आणि कोणत्याही विशिष्ट उत्पादन, सेवा किंवा संस्थेचे समर्थन किंवा प्रचार म्हणून समजली जाऊ नये, जोपर्यंत स्पष्टपणे उल्लेख केलेला नसेल. या वृत्तपत्रात बाह्य संकेतस्थळे, दस्तऐवज किंवा स्रोतांसाठी दुवे (हायपरलिंक्स) असू शकतात. त्या बाह्य स्रोतांवरील सामग्री, अचूकता किंवा उपलब्धतेवर विभागाचा नियंत्रण नाही.